**BMRLA–135**

# B. A. (GENERAL) (BAG)

## Term-End Examination

## December, 2024

### BMRLA-135 : MODERN INDIAN LANGUAGE : MARATHI

*Time : 3 Hours* *Maximum Marks : 100*

---

***नोट*** : सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

---

1. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयांवर निबंध लिहा : 20

   (अ) पाणी टंचाई–एक ज्वलंत समस्या

   (ब) भारत एक कृषीप्रधान देश

   (क) शिक्षण विकासाचा पाया

   (ड) तंत्रज्ञान मायानगरी

2. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 16

(अ) संत तुकारामांनी विठ्ठलभक्ती 'दृष्टांता' द्वारे कशी व्यक्त केली आहे ?

(ब) होनाजी बाळाची लेखनशैली विषद करा.

(क) 'तुतारी' सामाजिक अन्यायाविरुद्ध बंड करते, चर्चा करा.

(ड) मर्ढेकरांच्या कवितेत सतत वेदनेची इंद्रायणी वाहते स्पष्ट करा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 12

(अ) 'वळीव' कथेतील वादळाचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

(ब) 'कातरवेळ' कथेचे अर्थपूर्ण निवेदन सौंदर्य स्पष्ट करा.

(क) प्र. ई. सोनकांबळेना अस्पृश्यतेचे चटके लागले, 'चेलमा' द्वारे स्पष्ट करा.

(ड) सोन्याच्या पिंपळाचे वर्णन करा.

4. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयांवर टीप लिहा : 12

(अ) ललित वाङ्मयाच्या वाचनाने आनंद होतो.

(ब) स्वावलंबी शिक्षण

(क) स्त्रीची बदलती भूमिका

(ड) लोकसंख्या वाढ एक भीषण समस्या

5. भावे प्रयोग म्हणजे काय ? भावे प्रयोगाची **दोन** उदाहरणे द्या. 10

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **एका** कल्पनेचा विस्तार करा : 10

(अ) शिक्षणाचे उद्दिष्ट जाणीव जागृती असते.

(ब) आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ?

(क) असेल तर दिवाळी नसेल तर शिमगा.

(ड) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

6. पुढीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 6

(अ) उंटावरचा शहाणा

(ब) सळो की पळो करणे

(क) हातपाय हलविणे

(ड) वाकडे पाऊल पडणे

(इ) काणा डोळा करणे

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

(ब) अडला हरी गाढवाचे पाय धरी

(क) करावे तसे भरावे

(ड) खाऊन माजावे पण टाकून माजू नये

(इ) जगाच्या कल्याणा संताच्या विभूती

7. पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 8

(अ) भारतातील सामान्य 'स्त्री'ची स्थिती कशी आहे, चर्चा करा.

(ब) पु. ल. देशपांडेनी शिंप्याकडून आलेला अनुभव कसा वर्णन केला आहे ?

(क) भाषेचा प्रचार-प्रसार करणे आजच्या युगात का गरजेचे आहे ?

(ड) विज्ञानजानित तंत्रज्ञानात मानवाचा तरणोपाय आहे, स्पष्ट करा.

8. पुढील इंग्लीश उतायाचे मराठीत भाषांतर करा : 8

Travelling by an aeroplane is the fastest and the most expensive means of transport in our country. Almost every parts of India can now be reached by an aeroplane. The air transport in India was started in 1911. Now it is widely used for long distance travel. The cargo planes

carry perishable and costly goods, such as fresh fruits, flowers, vegetables, etc, to far off places.

The helicopters are used for short distance travel. They can easily reach even difficult areas. The helicopters are helpful in times of difficulty, such as floods, earthquakes, epidemics etc. We can also rescue people during natural or man-made disasters.

9. पुढील उताऱ्याचा सारांश लिहा : 8

"ललित लेखकाने हरत-हेची माणसे व स्थळे पाहिली पाहिजेत. सज्जना-प्रमाणेच दुर्जनाचेही वेगवेगळे नमुने त्याने अवलोकन करून ठेवले पाहिजेत. राजांच्या राजप्रासादाप्रमाणेच जंगलातील खोपटी ही त्याच्या पाहण्यात आली पाहिजेत. मनुष्यस्वभावांच्या हजार तऱ्हांची त्याच्याजवळ नोंद पाहिजे आणि उदात्त प्रसंगाप्रमाणेच गलिच्छ प्रसंगाचे हजार प्रकार त्याच्या अवलोकनात यायला पाहिजेत.

लेखकाचे अवलोकनाचे केंद्र संकुचित असले की त्याच्या कृतीत विविधता दिसत नाही. त्याची कृती ही कंटाळवाणी वाटू लागते. हरिभाऊ आपट्यांचा मोठेपणा सरळ अंतकरणाला भिडणा–या त्यांच्या भाषेत व त्यांच्या मार्मिक सुधारकी विचारसरणीत तर आहेच; पण त्यांनी निर्माण कलेल्या व्यक्तिंच्या व प्रसंगाच्या वैचित्र्यात तो अधिक आहे. मोठ्या लेखकांच्या कल्पनेची झेपच वाघासारखी पल्लेदार असते. याचे कारण त्याचे अवलोकनाचे क्षेत्र फार दांडगे असते."

× × × × × × ×